भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०३/२०१७

१) कार्यालयाचा शटर्र वाकवुन आत प्रवेश करुन सामानाची व नगदी पैश्याची चोरी . :–

दिनांक ०४+५/०३/२०१७ चे १८.००ते ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांनी आपले तिर्थ एक्वा आरो प्लॉट गडकुंभली रोड साकोली हे कार्यालय बंद करुन तसेच त्याची सिल्वर रंगाची स्विप्ट वीडीयार गाडी क्र. एमएच ३६ एच ०३७७ ही कार्यालयाचे बाहेर पार्क करुन कार्यालयातच ठेवुन निघुन गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कार्यालयाचे शटर्र वाकवुन आत प्रवेश करुन कार्यालयात ठेवलेले कंबॅक कंपनीचा लॅपटॉप, कॉऊन्टर मधुन नगदी १,०००/–रु. सिल्वर रंगाची स्विप्ट विडीयार गाडी असा एकुण किंमती २,१६,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी अरवींद वामनराव डोंगरवार वय ३९ वर्ष, रा. घानोड ह. मु. प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५४,४५७,३७९,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

२) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु तर एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०५/०३/२०१७ चे ०९.४५ वा. दरम्यान यातील मोटार सायकल पॅशन प्रो क्र. एमएच ३६ व्ही १६७२ चा चालक व त्याचे मागे बसलेला असे दोघेही महामार्ग क्र. ०६ नी जात असता लाखनी कडुन जाणाऱ्या आरोपी ट्रक चालाकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक दिल्याने मोटार सायकलवर बसणारा अवीनाश शंकर गोबाडे वय ५० वर्ष, रा. कोका यास गंभिर जखमी होण्यास व प्रल्हाद मळु हातझाडे वय ५५ वर्ष, रा. कोका याचे मरणास कारणीभुत झाल्याने व ट्रक चालकाने पोस्टेला कोणतेही माहीती न देता पळुन गेल्याने जखमीचे बयाना वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) पानठेल्याला आग लावुन साहीत्याची नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०५/०३/२०१७ चे ०३.०० वा. पुर्वी यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे पानठेल्याला आग लावुन पानठेल्यात असलेला नोकीया कंपनीचा मोबाईल, टेबलफॅन, बीडी, सिगारेट पॉकीट व सुपारी व इतर साहीत्य एकुण किंमती ५०,०००/–रु. चे जाळुन अपक्रीया केल्याने फिर्यादी भारत भाऊजी रिनायते वय ४० वर्ष, रा. सीतासावंगी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

४) मोटार सायकलच्या निष्काळजीपणामुळे, दोन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०४/०३/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील जखमी लक्ष्मीकांत जयदेव भोरजार वय २६ वर्ष, व कु. उंद्राली सुर्यभाण वासनीक वय १९ वर्ष, रा. पेट्रोल पंप ठाणा हे आपले मोटार सायकल क्र. एमएच ३१ पीएस ५६६९ ने पेट्रोल पंप वरुन शाहापुर येथे धाब्यावर जेवन करण्याकरीता जात असता यातील अज्ञात आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने निष्काळजीपने व लापरवाहीने भरधाव वेगाने चालवुन जखमीचे मोटार सायकल ला मागेहुन धडक मारुन मोटार सायकल वरील दोघांनाही जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने जखमीचे बयान व डॉ रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

५) मोटार सायकल स्लीप होवुन तीन जखमी . :–

दिनांक ०५/०३/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील हिरो होंडा पॅशन प्रो मोटार सायकल ही दारु पिऊन जखमी आनंदराव पुसाम, पिन्टु कोडापे यांना तीन सिट बसवुन धारगाव वरुन चंद्रपुर मार्गे डांबरी रोडाने दुधारा येथे जात असता लापरवाहीने, हयगयीने व निष्काळजीपने मोटार सायकल चालवित जात असतांना रोडाचे वळणावर गाडी स्लीप होवुन स्वत:व दोन्ही जखमी हे खाली पडुन गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८५(१),१२८/१७७,१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक ०६/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. मोहाडी, तुमसर, कारधा व येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३७ लिटर हातभटटी दारु किंमती २,५००/–रु. व तसेच जुगारातुन किंमती ६,८८५ /–रु. असा एकुण किंमती ९,३८५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८[illegible]५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.